स्थायी समितीच्या **सोमवार** दिनांक 26–11–2012 रोजी दुपारी 12–30 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## <u>उपस्थित सभासद</u>

| | | |
|---|---|---|
| **1.** | श्री. तिवारी दयाशंकर चन्द्रशेखर | **अध्यक्ष** |
| 2. | सौ. कानतोडे भाग्यश्री गणेश | सदस्या |
| 3. | श्री. सतीश विठ्ठलराव होले | सदस्य |
| 4. | सौ. बहादुरे सरोज राजु | सदस्या |
| 5. | श्री. खान असलमखां रशीद खान | सदस्य |
| 6. | श्री. डोळस रविंद्र गोविंदराव | सदस्य |
| 7. | श्री. राजू ज्योतीरामजी लोखंडे | सदस्य |
| 8. | सौ. सुजाता विठ्ठलराव कोंबाडे | सदस्या |
| 9. | श्री. थूल राजू वासुदेवराव | सदस्य |
| 10. | श्री. हजारे पुरूषोत्तम नागोराव | सदस्य |
| 11. | श्री. गुडधे प्रफुल्ल विनोदराव | सदस्य |
| 12. | सौ.जैसवाल हर्षला संजय | सदस्या |
| 13. | सौ. प्रगती अजय पाटील | सदस्या |
| 14. | सौ.अलका अजय दलाल | सदस्या |

## <u>अनुपस्थित सभासद</u>

| | | |
|---|---|---|
| 1. | सौ. वानखेडे अनीता प्रदिप | सदस्या |
| 2. | श्री. फुके परिणय रमेश | सदस्य |

## <u>उपस्थित अधिकारी</u>

1) श्री. हेमंतकुमार पवार, अति. निगम आयुक्त
2) श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

<u>ठराव क्रमांक 189</u> :– कन्हान पाणीपुरवठा केंद्राचा वीज पुरवठा अखंडीत राहण्याकरीता, MSETCL च्या कन्हान स्थित 220 KV सब स्टेशन मधून आणावयाच्या Dedicated Feeder व त्या अनुषंगाने, कन्हान जलशुध्दीकरण केंद्रात बदलवावयाच्या आवश्यक उपकराणांसह (Transformers, switch-gears etc.) करावयाच्या कामासंदर्भात खालील प्रस्तावास मंजुरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन,

1. Dedicated Feeder व्दारे विद्युत पुरवठयाचे अनुषंगाने कन्हान जलशुध्दीकरण केंद्रात करावयाच्य आवश्यक कामांकरिता ( 33 KV sub-station) ई–निविदा व्दारे प्राप्त 3 निविदांपैकी,मे.बालाजी असोसिएटस्, नागपूर यांची रु.2,71,43,568/– ची निम्नतम निविदा स्विकृत करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.
2. 220 KV कन्हान सब स्टेशन येथून म.न.पा.च्या कन्हान जलशुध्दीकरण केंद्राकरिता आणावयाच्या Dedicated Feeder करिता, 220 KV कन्हान सब स्टेशन मध्ये आवश्यक बे (Bay) व उपकरणे उपलब्ध करुन देण्याकरिता MSEDCL ने मागणी केल्याप्रमाणे, त्यांना रु.33,50,000/– रक्कमेचे भूगतान करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.
3. या अगोदर,म.न.पा. तर्फे MSEDCL ला MSETCL च्या 220 KV कन्हान सब स्टेशन पासून, कन्हान जलशुध्दीकरण केंद्राकरिता Dedicated Feeder ने विद्युत पुरवठा करण्याकरिता करण्यात आलेले भूगतान रु.3,46,90,352/– सह वरीलप्रमाणे रु.2,71,43,368/– व रु.33,50,000/– असा एकूण खर्च रु.6,61,61,061/– च्या सुधारीत खर्चास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन कार्यालयाने सुचविलेल्या खालील दुरुस्तीसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

   <u>दुरुस्ती</u> :– भूगतान रु. 3,46,90,352/– ऐवजी रु. 3,46,92,352/–
   एकुण खर्च रु. 6,61,61,061/– ऐवजी रु. 6,51,85,920/–

<u>ठराव क्रमांक 190</u> :– सुदामा मित्र योजने अंतर्गत मनोरुग्नावर उपचार करुन त्यांचे पुनर्वसन करण्याच्या दृष्टीने धंतोली झोन कार्यालयाजवळील म.न.पा. शाळेच्या इमारतीचे नुतणीकरण करण्याच्या प्राकलनात खालील कामे अंतर्भुत आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| अ) | स्थापत्य कामे | – रु. | 27,27,138.00 |
| ब) | विद्युत विषयक कामे | – रु | 2,18,171.00 |
| क) | प्रकल्प व्यवस्थापन फी | – रु | 1,13,085.00 |
| | **एकूण** | – रु | **30,58,394.00** |

या कामास्तव म.न.पा. मध्ये नोंदणीकृत प्रकल्प व्यवस्थापकिय सल्लागार मे. उमेश पाटील यांना म.न.पा. च्या मंजूर दरानुसार नियुक्त करुन त्यांना रु. 1,13,085.00 सेवा शुल्कास मंजूरी प्रदान करणे. तसेच वरीलप्रमाणे एकूण रु. 30,58,394.00 राशीच्या प्रकल्पास प्रशासकिय मान्यता देण्याचा प्रश्न विचारात घेऊन रितसर निविदा काढण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 191</u> :— संत गुलाब बाबा प्राथमिक शाळा हंसापुरी येथे अंतग्रही क्रिडा संकुल निर्माण प्रकल्पात खालील कामे अंतर्भुत आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| अ) | स्थापत्य कामे | — रु. | 67,93,439.00 |
| ब) | विद्युत विषयक कामे | — रु | 4,63,545.00 |
| क) | प्रकल्प व्यवस्थापन फी | — रु | 2,47,709.00 |
| | **एकूण** | — रु | **75,04,693.00** |

या कामास्तव म.न.पा. मध्ये नोंदणीकृत प्रकल्प व्यवस्थापकिय सल्लागार में. कोरान्ने कन्सलटंट यांना म.न.पा. च्या मंजूर दरानुसार नियुक्त करुन त्यांना रु. 2,47,709.00 सेवा शुल्कास मंजूरी प्रदान करणे. तसेच वरीलप्रमाणे एकूण रु. 75,04,693.00 राशीच्या प्रकल्पास प्रशासकिय मान्यता देण्याचा प्रश्न विचारात घेऊन रितसर निविदा काढण्यास मंजुरी प्रदान करण्यचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 192</u> :— मनपाच्या हॉट मिक्स प्लॅन्ट विभागाकरीता नवीन 1 नग वायब्रेटर रोलर @ 8.5 MT क्षमतेच्या खरेदी करण्याकरीता रु. 29.00 लक्ष राशीचे प्रस्तावास / प्राकलनास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न तसेच निविदा काढण्याची परवानगी देण्यांत यावी.

उपरोक्त प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 193</u> :— वॉर्ड क्र. 96, हिवरी नगर पंपींग स्टेशन जवळील वाठोडा रोड—नागनदीवरील जुना अरुंद पूल तोडून नविन पूलाच्या बांधकामास्तव तयार करण्यात आलेल्या रु. 1,44,35,980/— रकमेच्या सुधारित प्राकलनास पद क्र. 678 अंतर्गत प्रशासकीय मंजुरी प्रदान करणे, पस्तुत कामाचे मंजूर निविदाकार मे. अबरार अहमद, यांचेडून त्यांचे मंजूर निविदादरावर (प्राकलनीय दर) करवून घेण्यास्तव तसेच या कामास्तव म.न.पा. मध्ये नोंदणीकृत प्रकल्प व्यवस्थापकीय सल्लागार मे. विघ्नहर्ता कंसलटंट, यांची म.न.पा. च्या मंजूर दरावर नेमणूक करण्याचा प्रचलित नियमानुसार सेवाशुल्क प्रदान करण्याचा तसेच या कामास्तव लागणाऱ्या उर्वरित रु. 1,04,35,980/— रकमेस प्रावधान उपलब्ध करुन देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन पारडी पुलाकरीता अर्थसंकल्प 2012—13 मध्ये पद क्र. 678 रु. 600 लक्ष राखीव ठेवण्यात आले आहे. ते उर्वरीत पुलाच्या कामाकरीता वळते करण्यात येते. वळते करण्यात आलेल्या निधी मधुन रु. 1,04,35,980/— च्या प्रस्तावित काम करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 194</u> :— नागपूर महानगरपालिकेच्या जकात विभागातील पांच नाक्यावर (वर्धा रोड नाका अमरावती रोड नाका, हिंगणा रोड नाका, भंडारा रोड नाका आणि रेल्वे स्टेशन नाका) Scanning System लावावयाची आहे. त्या करीता EOI बोलाविण्यात आलेला होता त्या नुसार प्राप्त EOI चे मध्ये मे. SCS PVT. LTD. यांचे निम्नतम दर प्राप्त झालेत. प्राप्त दरास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 195</u> :— धंतोली झोन क्र. 4 मधील प्रभाग क्र. 26 महाराजबाग येथिल पत्रकार कॉलनी च्या मागील बाजुस असलेल्या नाल्याला आर.सी.सी. भिंतीचे बांधकाम करण्याचे कामास्तव पद क्र.618 मधुन रु. 1,35,66,486/— राशीचे प्राकलनास प्रशासकीय मंजुरी देऊन निविदा काढण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 196</u> :— गड्डीगोदाम चौक, इंदोरा चौक, दोसर भवन चौक, गीतांजली चौक, सेवासदन चौक, सोना रेस्टारेन्ट चौक, चंद्रशेखर आझाद चौक, वर्धमान चौक, मेश्राम टी पॉईन्ट आणि छावणी टी पॉईन्ट वर वाहतुक सिग्नलची पुर्नरचना (Renovation-LED base with Battery Back up & Timer इत्यादी सह ) करण्याकरिता ची ई—निविदा अंतर्गत प्राप्त मे. न्युक्लिऑनिक्स, पूणे यांची 2 टक्के नी कमी दराची रुपये 43,70,800/— ची प्रथम निम्नतम निविदेला प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन फेर निविदा काढण्यास विषय कार्यालयास परत करण्यास समितने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 197</u> :— म.न.पा. च्या विविध विभागांना संगणक ऑपरेटर्स (Computer Operators) चा पुरवठा करणे यासाठी,

अ) या कामासाठी प्रशासनातर्फे रु.1,19,44,800/— चा प्रस्ताव तयार करुन स्थायी समिती यांच्याकडे पाठविण्यात आला होता व त्यास ठराव क्र.100 दि.7.8.2012 अन्वये मंजुरी प्राप्त झाली होती, परंतु हा ठराव कार्यान्वीत झालेला नाही.

महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र. रोहयो/2011/प्र.क्र.23/रोहयो—9,दि.8 डिसेंबर 2011 नुसार प्रती माह प्रती संगणक ऑपरेटर (Computer Operators) रु. 6000/— याप्रमाणे सुधारीत प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

ब) रु.6000/— प्रति संगणक ऑपरेटर (Computer Operators) या प्रमाणे एकुण 100 संगणक ऑपरेटर्स (Computer Operators) यांच्यासाठी 1 वर्षाकरीता रु. 72,00,000/— चा खर्च अपेक्षित आहे. याआधी पाठविलेला प्रशासनाचे प्रस्तावाचा वार्षिक खर्च एकुण रु. 1,19,44,800/— इतका अपेक्षित होता. सुधारित प्रस्तावानुसार रु. 47,44,800/— ची बचत होईल.

करिता रु.6000/— प्रति संगणक ऑपरेटर (Computer Operators) प्रती माह याप्रमाणे एकुण 100 संगणक ऑपरेटर्स (Computer Operators) लावण्याकरीता रु. 72,00,000/— च्या वार्षिक खर्चास व निविदा बोलावून हे काम करण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन विभागाने म.न.पा. अधिनियम 64 (क) चे वाचन केले. त्या अनुषंगाने स्थायी समिती ठराव क्र. 100 दिनांक 07.08.2012 च्या ठरावास दिलेली मंजूरी कायम ठेवण्यास मा. सदस्य प्रफुल्ल गुडधे यांनी केलेल्या सुचनेस स्थायी समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली. तसेच प्रमुख लेखा वित्त अधिकारी यांचे निवेदनाप्रमाणे थर्ड पार्टी भुगताण करण्यास हरकत नाही असे नमुद केले. त्यामुळे विभागाने त्या प्रमाणे नियमाप्रमाणे योग्य कार्यवाही प्रस्तावित प्रकरणात व या सारख्या समकक्ष प्रकरणात करावी. यासह विषयास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 198</u> :— प्रभाग क्र.40—ब, ज्योतीनगर येथे समाज भवनाचे बांधकामाकरिता स्थापत्य स्वरुपाचे कामास्तव (पी.एम.सी. सेवाशुल्कासह) रु. 48,98,231/— रकमेच्या प्राकलनास पद क्र. 642 अंतर्गत प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे, तसेच या कामास्तव म.न.पा. मध्ये नोंदणीकृत प्रकल्प व्यवस्थापकीय सल्लागार, मे. लेटस् बिल्ड यांची म.न.पा. च्या मंजूर दरावर नेमणूक करण्याचा प्रचलित नियमानुसार सेवाशुल्क प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 199</u> :— प्रभाग क्र. 32 (ब) मधील स्मॉल फॅक्टरी एरीयामधे प्रकाश व्यवस्था करण्याकरीता रु. 30,91,590/— च्या प्राकलनास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 200</u> :— स्थायी समिती ठराव क्र. 173 दि. 12.11.2012 अन्वये रुपये 26,48,000/— च्या प्राकलनास प्रशासकीय मंजूरी नुसार नागपूर शहरात येणारे हिवाळी अधिवेशना करीता वि.आय.पी. रोड वरील/परिसरातील फुटपाथ, डिवायडर व चैनलाईझर ला ऑईल पेटींग करण्याकरिता मॅन्युफॅक्चर्स/अधिकृत विक्रेता/नोंदणीकृत कंत्राटदार यांचे कडून प्राप्त मे. यादव हार्डवेअर आणि पेन्टस आणि मे. साई इन्फ्रास्ट्रक्चर्स यांची 3 टक्के नी कमी असलेली समान दराची निविदा अंतर्गत प्रत्येकी रुपये 12,84,280/— चे काम देण्याकरीता प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 201</u> :— प्रभाग क्र.48,रेशीमबाग येथील विविध रस्त्यांचे डांबरीकरण करण्याचे कामास्तव रु.29,95,024/— राशीचे प्राकलनास प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 202</u> :— प्रभाग क्र.56 ''ब'' येथील प्रगती शाळा ते रेल्वे अंडर पुल पर्यंत नाल्याच्या बांधकाम करण्याच्या कामास्तव रु.29,00,000/— च्या प्राकलनास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे तसेच निविदा काढण्याची परवानगी चा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 203</u> :— नागपूर महानगरपालिका लेखा संहिता (Acconts Code) प्रारुपास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

केंन्द्र शासनाचे National Municipal Accounting Manual प्रमाणे महानगरपालिकेचे लेखा संहिता करणे बाबत राज्य शासनाचे निर्देश आहेत. त्यानूसार नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम 1948 चे अधिनस्त राहून, केंद्र शासन व राज्य शासन यांनी ठरवून दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार नागपूर महानगरपालिकेची लेखा संहिता (Acconts Code) तयार करण्यात आली आहे.

सदर लेखा संहितेनुसार यापूढे नागपूर महानगरपालिकेचे अंदाजपत्रक, उत्पन्न व खर्चाचे लेखे सुध्दा ठेवावयाचे आहेत. सदर लेखा संहिता नागपूर महानगरपालिकेच्या स्थायी समितीकडे आवश्यक त्या दुरुस्ती व सुधारण करीता मंजूरीस्तव सादर. स्थायी समितीचे मंजूरी नंतर सदर बाब ही धोरणात्मक स्वरुपाची असल्यामुळे नागपूर महानगरपालिका लेखा संहिता (Nagpur Municipal Corporation Accounts Code - Valume I Rules & Valume II Content) ला मान्यता देण्याचा प्रश्न विचारात घेऊन अंतिम रीत्या मंजूरीकरीता महानगरपालिका महासभेसमोर सादर करण्यात येईल.

उपरोक्त प्रश्न समितीने विचारात घेऊन प्रस्तावित विषयास एकमताने मंजूरी प्रदान केली, अंतीम मंजूरीसाठी म.न.पा. सभागृहास पाठविण्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 204</u> :— प्रभाग क्र. 52 मध्ये शंकरनगर शिवाजी नगर धरमपेठ खरे टाऊन येथील रस्त्याचे डांबरीकरणास्तव रु. 29,99,675/— रकमेच्या प्राकलनास पद क्र. 682 अतर्गत प्रशासकिय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 205</u> :— प्रभाग क्र. 49—ब मध्ये चंदननगर, महेश कॉलनी पी.टी. एस. क्वॉर्टर येथे रस्त्यांचे रुंदीकरण व डांबरीकरण करण्याचे कामास्तव रु. 28,15,051/— राशीचे प्राकलनास प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 206</u> :— प्रभाग क्र. 8, गोरेवाडा घाट येथे पिवळया नदीवर पुलाचे बांधकाम व इतर बांधकामास्तव रु. 35,25,780/— रकमेच्या प्राकलनास पद क्र. 678 अंतर्गत प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे, तसेच या कामास्तव म.न.पा. मध्ये नोंदणीकृत प्रकल्प व्यवस्थापकीय सल्लागार, मे. एन वास्तु यांची म.न.पा. च्या मंजूर दरावर नेमणूक करण्याचा प्रचलित नियमानुसार सेवाशुल्क प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 207** :— प्रभाग क्र. 40, मध्ये केजाजी महाराज मठ ते विक्की ड्रायव्हींग स्कुल, बुध्द्खॉ मिनार येथे व बनगीरीवाडा ते पत्थरफोड दरवाजा ते म.न.पा. जिम्नॅशियम पर्यंत सिमेंट कॉक्रिट रस्ता बांधकामाचे एकत्रित रु. 83,17,596/— पद क्र. 681 अंतर्गत प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 208** :— स्वामी विवेकानंद यांची 150 वी जन्म शताब्दी निमित्य अंबाझरी ओव्हर फ्लो पॉईट वर स्वामी विवेकानंदाची 20 फुट उंचीचा पुतळा तयार करण्यास्तव सुरक्षिततेच्या दृष्टीने नाल्यावर पूल व इतर स्थापत्य कामास्तव रु. 44.50 लक्ष रकमेच्या प्राकलनास पद क्र. 678 अंतर्गत प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन उदयदत्त गजभिये, "E.N.VASTU" असोसिएट्स यांना P.M.C. म्हणून नियुक्त करण्याच्या कार्यालयाच्या सुचनेप्रमाणे, लघू निविदा काढण्यासह विषयास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 209** :— स्वामी विवेकानंद यांची 150 वी जन्म शताब्दी निमित्य अंबाझरी ओव्हर फ्लो पॉईट वर स्वामी विवेकानंदाची 20 फुट उंचीचा पुतळया सभोवताल संरक्षण भिंत व स्टोन पिचींगचे कामे करण्यास्तव रु. 49.50 लक्ष रकमेच्या प्राकलनास पद क्र. 618 अंतर्गत प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन उदयदत्त गजभिये, "E.N.VASTU" असोसिएट्स यांना P.M.C. म्हणून नियुक्त करण्याच्या कार्यालयाच्या सुचनेप्रमाणे, लघू निविदा काढण्यासह विषयास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 210** :— स्वामी विवेकानंद यांची 150 वी जन्म शताब्दी निमित्य अंबाझरी ओव्हर फ्लो पॉईट वर स्वामी विवेकानंदाची 20 फुट उंचीचा पुतळा बसविण्यास्तव पेडस्टल तयार करण्यास्तव रु. 102 लक्ष रकमेच्या प्राकलनास पद क्र. 701 अंतर्गत प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन उदयदत्त गजभिये, "E.N.VASTU" असोसिएट्स यांना P.M.C. म्हणून नियुक्त करण्याच्या कार्यालयाच्या सुचनेप्रमाणे, लघू निविदा काढण्यासह विषयास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 211</u>** :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

अध्यक्ष
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर